हॉटेल राजलक्ष्मी
व्हेज & नॉनव्हेज
कुटुंबासाठी जेवणाची स्वतंत्र आणि उत्तम सोय
प्रो.प्रा.अजिंक्य (भैया) शिराळे
एक वेळ अवश्य भेट द्या बार्शी रोड,बीड-431122

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

छ.संभाजीनगर शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ । वर्ष ६ वे । अंक ३६ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

स्वराज
वॉटर सोल्युशन
आमच्याकडे सर्व कंपनीच्या वॉटर फिल्टरची विक्री व दुरुस्ती योग्य दरात केली जाईल.
प्रो.प्रा.अजय भोसले
9673798477
8830127742
मधुमीना कॉम्प्लेक्स, राजीव गांधी चौक, बीड

शुद्ध सोन्या-चांदीच्या दागिन्यांची हमी मजुरीही कमी..!
कैलास ज्वेलर्स
9420469999
सुभाष रोड, कबाडगल्ली कॉर्नर, बीड

# सुनेत्रा पवार मुख्यमंत्री झाल्या तर आनंदच, राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांना जोर

मुंबई । प्रतिनिधी

**दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेनं पुन्हा एकदा जोर धरलाय... आणि त्याला कारण ठरलंय पवारांच्या राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळेंनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबद्दल केलेलं वक्तव्य...**



सुनेत्रा पवार मुख्यमंत्री झाल्या तर आपल्याला आनंदच होईल, असं वक्तव्यच सुळेंनी केलंय.. एवढंच नाही तर सुनेत्रा पवारांच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्याचे संकेतही सुळेंनी दिलेत.. खरं तर विधानसभा निवडणुकीनंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेनं जोर धरला होता... त्यासाठी अजित पवार आणि पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या बैठकाही झाल्या.... दोन्ही राष्ट्रवादीनं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका एकत्रही लढल्या... मात्र अचानक अजित पवारांचा विमान अपघात झाला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला... त्यानंतर विलिनीकरणाच्या चर्चेला ब्रेक लागलाय..याच मुद्द्यावर रोहित पवारांना प्रश्न विचारला असता त्यांनी दादा असते तर राष्ट्रवादीचं विलिनीकरण झालं असतं आणि २०२९ मध्ये अजित पवार मुख्यमंत्री बनले असते, असंही म्हटलंय... खरं तर सुनेत्रा पवारांच्या पोटनिवडणुकीसाठी युगेंद्र पवार, रोहित पवारच नाही तर सुप्रिया सुळेंनीही प्रचार केला... सुळेंनी तर महायुतीच्या स्टेजवर जावून सुनेत्रा पवारांना पाठींबा दिला... यानंतर आता सुप्रिया सुळेंनी सुनेत्रा पवारांच्या मुख्यमंत्रिपदाबाबत वक्तव्य केलंय.. त्यामुळे सुळेंनी पुन्हा दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचे संकेत दिलेत का ? त्यासाठी कौटुंबिक पातळीवर हालचाली सुरु आहेत का ? अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगलीय.

श्री.गंगाभारती कृपा
आदित्य
फर्निचर मॉल
7038389999
छत्रपती संभाजी महाराज चौक, बार्शी रोड, बीड

## शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज

मुंबई । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यांची प्रकृती आता उत्तम असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे, असे वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शरद पवार यांना नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तपासणीनंतर त्यांची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांनी त्यांना सध्या पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. तसेच काही काळ प्रवास टाळण्याच्या सूचनाही त्यांना करण्यात आल्या आहेत. सध्या ते त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत, असे वृत्तात सांगण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी देखील द वर पोस्ट करून माहिती दिली की, आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांची प्रकृती स्थिर आहे. रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन ते आपल्या निवासस्थानी आराम करीत आहेत.

## सेना मंत्र्याचा आदेश-सेना नेत्यानेच धुडकावून लावला

### मराठी सक्तीविरोधात रिक्षावाल्यांना साथ, सरकारला इशारा

मुंबई । प्रतिनिधी

रिक्षा-चालकांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयासंबंधी संमिश्र प्रतिक्रिया उमटत असताना उत्तर भारतीय नेते, माजी खासदार, शिवसेना नेते संजय निरूपम यांनी रिक्षावाल्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठीचा आदर आहे पण कष्टकरी रिक्षाचालकांच्या पोटावर पाय येणार असेल तर आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा देऊन आपल्याच पक्षाच्या मंत्र्याने घेतलेला निर्णय संजय निरूपम धुडकावून लावण्याच्या तयारीत आहेत. मुंबई आणि उपनगरातील रिक्षा चालकांची मराठी भाषेची परीक्षा घेतली जाणार असून, त्यात अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचे



परवाना किंवा बिल्ला जप्त केला जाईल. येत्या १ मे पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. मराठी भाषिकांकडून या निर्णयाचे समर्थन होत असताना उत्तर भारतीय नेते मात्र सरळ सरळ रिक्षाचालकांची बाजू घेत आहेत.

हा त्यांच्यावर अन्याय नाही का ? शिवसेना नेत्याने घेतली अमराठी रिक्षा चालकांची बाजू

महाराष्ट्रात मराठी भाषेचा आदर व्हायलाच हवा. प्रत्येकाने मराठी बोलली पाहिजे आणि समजून घेतली पाहिजे, या सरकारच्या आग्रहाचा आम्ही पूर्ण सन्मान करतो. पण सक्ती चुकीची असल्याचे निरूपम म्हणाले. पोटापाण्यासाठी राबणाऱ्या ऑटो-टॅक्सी चालकांवर अशा प्रकारे परीक्षेची सक्ती करणे चुकीचे आहे. प्रवाशांशी संवाद साधण्यापुरती 'कामचलाऊ मराठी' चालकांना येणे आवश्यक आहे, हे मान्य करता येईल. पण त्यांनी मराठी लिहिण्यात, वाचण्यात आणि बोलण्यात पूर्णपणे 'पारंगत' असावे, अशी अपेक्षा करणे त्यांच्यावर अन्याय करणारे आहे, असे निरूपम म्हणाले.

▶▶ उर्वरित पान २ वर

## लक्ष्मीबाई गोपीनाथ मैड यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

लक्ष्मीबाई गोपीनाथ मैड यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८५ व्या वर्षी बुधवार दि. २२ एप्रिल रोजी राहत्या घरी निधन झाले. ट्विंकलीग स्टार स्कुलचे संचालक गणेश शेठ मैड , व कैलास ज्वेलर्सचे कैलास शेठ मैड यांच्या मातोश्री. त्यांच्या पाश्चात पाच मुली आणि दोन मुले ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने नातेवाईक, मित्र परिवाराकडून हळ हळ व्यक्त केली जात आहे. मैड परिवाराच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच प्रार्थना.

## महेश सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अविरोध!

### माजी आ.भीमराव धोंडे गटाचे कारखान्यावर निर्विवाद वर्चस्व

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर का.मतदार संघासह शेजारील तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची 'कामधेनू' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेश सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक अविरोध पार पडली आहे.या निवडणुकीत माजी आ.भीमराव धोंडे यांच्या समर्थकांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत कारखान्याची सत्ता



पुन्हा आपल्या ताब्यात ठेवली आहे. कारखान्यासारख्या मोठ्या संस्थेची निवडणूक अविरोध पार पडणे ही संपूर्ण परिसरासाठी अत्यंत आनंदाची बाब मानली जात आहे.या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत आष्टी विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आ.भीमराव धोंडे,युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे यांची महेश सहकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे बीड नगरीत होणार आगमन



माजलगाव । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडे वाडा येथे सुरु केलेल्या पहिल्या मुलीच्या शाळेच्या भिडेवाडा चित्ररथाचे आज शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ▶▶ उर्वरित पान २ वर

बेसिक कोचिंग क्लाससेस,बीड
इयत्ता १ ली ते १० वी सेमी
समर व्हॅकेशन बॅचेस
कालावधी २० एप्रिल ते १ जुन पर्यंत
१६ वर्षांची यशस्वी परंपरा
संचालक : वायभट एम.यु.
MO : 8575717171
प्रवेश देणे सुरु आहे
पत्ता : रेणु हॉस्पिटल शेजारी, शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड

## चारचाकी जळून खाक

### बांधाला लावलेली आग पडली महागात ;सावलीत उभी केलेली 'इर्टिगा' जळून खाक



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत असून एक महिन्यावर पावसाळा आल्याने शेतीतील कामाला वेग आला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत शेतातील कचरा किंवा बांध पेटवणे किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय आष्टी तालुक्यातील जामगाव ते ह.ना. आष्टा रोडवर आला आहे. शेतातील बांधाला लावलेली आग वाऱ्यामुळे पसरल्याने, जवळच झाडाच्या सावलीत उभी केलेली एक आलिशान 'इर्टिगा' कार काही क्षणांत जळून खाक झाली. या भीषण घटनेत गाडीची अक्षरशः राखरांगोळी झाली असून, संबंधित वाहनधारकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जामगाव-ह.ना. आष्टा मार्गावर एका शेतकऱ्याने आपल्या शेतातील बांधावरील पालापाचोळा आणि कचरा स्वच्छ करण्यासाठी तो पेटवून दिला होता. उन्हाची ▶▶ उर्वरित पान २ वर

## अखेर 5 कोटी खर्चून उभारलेल्या च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला वीजजोडणी

### ९ वर्षांचा 'अंधारातून उजेडाकडे' प्रवास पूर्ण, जलसमाधी आंदोलनाचे यश : डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला तब्बल ९ वर्षांनंतर अखेर वीजजोडणी मिळाल्याने संपूर्ण परिसर उजळून निघाला आहे. सुमारे ५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले हे केंद्र सुरुवातीपासूनच विजेअभावी निष्क्रिय अवस्थेत होते. मात्र सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर हा प्रश्न मार्गी लागला. विजजोडणी नसल्यामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नव्हते. प्रसूती, शस्त्रक्रिया व आंतररुग्ण विभागाच्या



सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना उपचारासाठी बीड शहरात जावे लागत होते. परिणामी नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी डॉ. ढवळे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या तीन वर्षांपासून विविध आंदोलनांचा मार्ग अवलंबण्यात आला. रास्ता रोको, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन यांसह अखेर च-हाटा येथील काकदरा साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत जिल्हा प्रशासनाने आरोग्य केंद्राच्या विद्युतीकरणासाठी निधी मंजूर केला. दरम्यान, यापूर्वी १६ लाख रुपयांचा निधी दोन वेळा उपलब्ध होऊनही बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे तो अखर्चित राहिल्याने काम रखडले होते. अखेर जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्या पुढाकाराने जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत १० लाख रुपयांचा निधी मंजूर करून विद्युत रोहित्र बसविणे व इतर ▶▶ उर्वरित पान २ वर

पाहिजेत
सिस्टर- (१ जागा)
ANM, GNM
अनुभव असलेल्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)
मावशी- (२ जागा)
काम येणाऱ्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)
भेटण्याची वेळ ११ ते २
-: संपर्क :-
जेथलिया हॉस्पिटल
जालना रोड, बीड
मो.क्रं. ७०२०५०३८३६

# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया



भारताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो. भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत 'ग्राम' ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.

स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.

पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.

७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.

या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे.

पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.

तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.

या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून कामकाज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.

राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.

आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.

शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी ओळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**

◆ पान १ वरून पुढे...

## सेना मंत्र्याचा...

...तर आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल- मराठी भाषेबद्दल ही सरळ-सरळ दादागिरी आहे. या अन्यायाविरोधात आम्ही परिवहन मंत्र्यांशी चर्चा करणार आहोत. जर सरकारने हा निर्णय मागे घेतला नाही, तर आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा निरूपम यांनी महाराष्ट्र सरकारला दिला आहे. कष्टकरी चालकांच्या रोजीरोटीवर गदा आणणारा हा निर्णय सरकारने त्वरित बदलावा, हीच आमची मागणी आहे, असेही निरूपम म्हणाले.

गुणरत्न सदावर्ते भाईंदरमध्ये, अमराठी रिक्षाचालकांना साथ- गुणरत्न सदावर्ते यांनी आज मीरा-भाईंदरचा दौरा करत इंद्रलोक परिसरात ऑटो रिक्षाचालक मालक आणि त्यांच्या युनियन सदस्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी परप्रांतीयांवर अन्याय सहन केला जाणार नाही, अशी भूमिका घेऊन अमराठी रिक्षाचालकांची बाजू घेतली. जर परप्रांतीयांवर अत्याचार झाला, तर तो अजिबात सहन केला जाणार नाही. तसेच राज ठाकरे यांनी जर एखाद्या रिक्षाचालकावर हात उचलला, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. रिक्षाचालकांना पाठिंबा दर्शवत, सुमारे पाच लाखांहून अधिक रिक्षाचालक आपल्या सोबत असल्याचा दावा त्यांनी केला. दुसरीकडे, सदावर्ते यांचे संपताच मनसे कार्यकर्त्यांनी सदावर्ते हाय हाय अशा जोरदार घोषणा दिल्या. यामुळे परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले.

## महेश सहकारी....

साखर कारखान्याच्या संचालकपदी अविरोध निवड झाली आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे- माजी आ.भीमराव धोंडे आणि डॉ. अजयदादा धोंडे यांच्या नेतृत्वाखालील खालील संचालकांची कारखान्याच्या संचालक मंडळावर अविरोध निवड करण्यात आली आहे. नियामत बेग जगताप संभाजी, झगडे सतीश, ॲड.निकाळजे रत्नदीप,सांगळे गणेश, शिंदे केशव, चव्हाण झुंबर, कर्डिले बजरंग, गावडे गजानन, गर्जे शहादेव,विधाते उद्धव,जगताप दादासाहेब,खेडकर अशोक,मोहोळकर तुकाराम, मुंडे अंकुश,श्रीमती गोल्हार क्रांती, श्रीमती नन्नवरे उज्वला,वाघुले बाबासाहेब,दिंडे सदाशिव या सर्व नवनिर्वाचित संचालकांचे आष्टी, पाटोदा, शिरूर परिसरातील शेतकरी,सभासद व नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.

## ऐतिहासिक भिडेवाडा...

१० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे आगमन होणार आहे.अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या पुढाकारातून व समता परिषदेचे कार्याध्यक्ष मा. खासदार समीरभाऊ भुजबळ व आमदार पंकज भाऊ भुजबळ यांच्या संकल्पनेतून भिडेवाडा - भारतातील पहिली मुलींची शाळा या ऐतिहासिक वारशाचा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचवण्याचे अतिशय प्रेरणादायी कार्य सुरू आहे.

हा रथ म्हणजे केवळ एक प्रतिकृती नाही, तर शिक्षण, समता आणि सामाजिक जागृतीचा दीप आहे. मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला, त्या महान कार्याची आठवण करून देणारा जिवंत प्रेरणा स्तोत्र आहे.

या पार्श्वभूमीवर बीड शहरात शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता या चित्ररथाचे आगमन होत असून महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष भाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत यांच्या नियोजनात या चित्ररथाचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. बीड नगरीतील शिव - फुले - शाहू - आंबेडकर चळवळीतील समाज बांधवांनी या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष भाऊ राऊत, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, व शहराध्यक्ष नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, मंगेश जमदाडे, रंजित सोन्नर, अजिंक्य सुरवसे, स्वप्नील शिंदे, सावता काळे, अजय राऊत, शरद विटकर, महेश वेवहारे, नामदेव मेत्रे, वैभव खेत्रे, ज्ञानेश्वर राऊत, सुशील चौधरी, शिवम बोराडे, स्वप्नील यादव, शुभम आखाडे यांच्यासह समता सैनिकांनी केले आहे.

## अखेर 5 कोटी....

आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली. वीजजोडणी झाल्यामुळे आता आरोग्य केंद्रात नियमित सेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून परिसरातील रुग्णांची होणारी हेळसांड थांबणार आहे. तसेच बीडला उपचारासाठी जाण्याचा आर्थिक भुर्दंडही वाचणार असल्याची प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली. या यशाबद्दल डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार, मनोज तांदळे, सुभाष बांगर, संपत नागरगोजे, सूर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव, भगिरथ उबाळे आदी आंदोलनकर्त्यांनी समाधान व्यक्त केले असून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत.

## चारचाकी जळून खाक....

तीव्रता आणि सोसाट्याचा वारा असल्यामुळे ही आग काही वेळातच नियंत्रणाबाहेर गेली. याच दरम्यान, कडक उन्हापासून बचाव व्हावा म्हणून एका वाहनधारकाने आपली पांढऱ्या रंगाची इर्टिगा गाडी रस्त्याशेजारील एका झाडाच्या सावलीत उभी केली होती. बांधावरून पसरत आलेली आग थेट गाडीपर्यंत पोहोचली. वाळलेले गवत आणि वाऱ्याच्या वेगामुळे आगीने रौद्र रूप धारण केले. गाडीने पेट घेतल्याचे लक्षात येताच आजूबाजूच्या लोकांनी धाव घेतली, मात्र आगीची तीव्रता इतकी मोठी होती की पाहता पाहता संपूर्ण गाडी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलीया घटनेत गाडीचे इंजिन, टायर आणि आतील सर्व भाग पूर्णपणे जळून खाक झाले आहेत. गाडीची केवळ लोखंडी सांगाडा शिल्लक राहिला आहे. लाखो रुपयांची गाडी डोळ्यादेखत जळताना पाहून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.सध्या उन्हाचा पारा ४० अंशांच्या पार गेला असून सर्वत्र कोरडे गवत आणि पालापाचोळा साचलेला आहे. अशा परिस्थितीत शेतकरी अनेकदा मशागतीसाठी बांध पेटवतात. मात्र, वाऱ्यामुळे ही आग शेजारील पिके, ठिबक संच किंवा रस्त्यावरील वाहनांपर्यंत पोहोचून मोठे अनर्थ घडू शकतात. त्यामुळे उन्हाळ्यात बांध पेटवताना किंवा आग लावताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

◆ पान ६ वरून पुढे...

## कऱ्हेवडगाव येथे...

ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे . दि २१रोजी रंणजित महाराज अरणगाव, दि. २२ रोजी ह.भ.प.डॉ. अमित महाराज डोके,दि २३रोजी ह. भ.प. काशीनाथ महाराज श्रीक्षेत्र गणेशगड नागतळा,दि. २४ रोजी धनंजय महाराज कदम,दि. २५ रोजी कार्तिकी महाराज जायभाय, २६ रोजी ह.भ. प . प्रविण महाराज मुळे, दि . २७ रोजी आजिनाथ महाराज आंधळे महादेवगड यांची किर्तन रुपी सेवा होणार आहे. असून दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ,६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम, ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण ११ ते १२ तुकाराम गाथा भजन, दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प . भागवताचार्य राजदिप महाराज आंधळे यांचे भागवत, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व रात्री ११ ते ४ हरिजागर होणार आहे. दि.२८ रोजी सकाळी ९ ते ११ वाजता ह.भ. प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.या सोहळ्यातील कीर्तन, भागवत, महाप्रसाद व विविध धार्मिक कार्यक्रमांचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कऱ्हेवडगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जनगणना २०२७ चा...

प्रशासनाच्या समन्वयाने एका विशेष नियंत्रण कक्ष(Monitoring Desk) कार्यान्वित करावा. अहवाल सादर करणे: राबविलेल्या सर्व उपक्रमांचे छायाचित्रे व व्हिडिओ दस्तऐवजीकरण करून कार्यवाहीचा सविस्तर अहवाल या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा. सदर काम आत्यंत महत्त्वाचे आणि कालबद्ध (Time-bound) स्वरूपाचे असल्याने, यामध्ये कोणत्या प्रकारचा विलंब किवा हलगर्जीपणा होणार नाही याची वैयक्तिक दक्षता घ्यावी, असे जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## शासकीय निधीतून...

६०५रु., जि.प.शाळा बांधकाम करणे ४लाख रुपये, पथदिवे बसवणे ३०हजार, ७०४, महिला व बालविकास विभाग ४०हजार रुपये. सिमेंट बाकडे बसविणे ९५हजार ७३४,गावा अंतर्गत बंदीस्त नाली बांधकाम २लाख ९९हजार,९९९रु, गावात पेव्हर ब्लॉक बसविणे २लाख ७२हजार ५९०रु, बौद्ध समाज मंदिरा समोर सिमेंट रस्ता तयार करणे २लाख ५०हजार, पिण्याच्या पाण्याचा नवीन स्त्रोत ६लाख ५३हजार २३८ रुपये. असा एकुण ३७लाख २९हजार,१३४रुपयांचा निधी शासनाकडून प्राप्त झाला होता यात ग्रामसेवक सुरेश वाघमारे व ग्रामसेवक संघटनेचे ता.अध्यक्ष आनंद कुमार सिरसट, सरपंच राहुल फुलगे,पं.स.अभियंता यांनी संगनमत करुन वरील पैकी काही कामे न करता कागदोपत्री काम केल्याचे बोगस कागदपत्रांच्या आधारे बीले उचलली आहेत. काहि कामे बोगस व निकृष्ट दर्जाची करून कामात अनियमितता आणुन ग्रामसेवक,सरपंच,अभियंता यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून शासनाचा २५लाख रुपये निधी हडप केला असे निवेदनात नमूद केले आहे. सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व पदांचा गैरवापर करून कामात अनियमितता आणुन भ्रष्टाचार केल्या प्रकरणी सरपंच व उपसरपंचावर अपात्रतेची कार्यवाही करावी अशी मागणी मनोज साळवे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## 'वाचाल तर....

सशक्त मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. वाचन संस्कृती वाढविण्याकरिता पालकांनी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून थोर शास्त्रज्ञ, समाजसेवक, साने गुरुजी, डॉ. एपीजे अब्दुल कलाम,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे, पर्यावरणावरील एक तरी पुस्तक आपल्या पाल्याच्या हातात दिले पाहिजे व त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे की शरीर स्वास्थ्य सांभाळून पुस्तकाचे वाचन करून वाचाल तर वाचाल.

कार्यक्रमास आयु. जी एम. भोले,प्रा.श्रीराम जाधव. ड राजेश शिंदे,ड मनोज वाघमारे, ड तेजस वडमारे,एस. एस सोनवणे, विशाल गायकवाड यांनी वाचाल तर वाचाल च्या मित्र नगर येथील मुख्य केंद्राला भेट दिली, त्या सर्वांचे वाचाल तर वाचाल तर्फे धम्मपद , (प्रा.डॉ मनोहर सिरसाट लिखित)महामानव व (कवयित्री माया दिवाण) यांचे नवी पहाट हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. ड तेजस वडमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

## वडवणी पोलिसांचा...

अंदाजे किंमत तब्बल १,२८,०००/- इतकी असून पोलिसांनी घटनास्थळीच संपूर्ण साठा नष्ट करून हातभट्टीचा कारखाना उद्ध्वस्त केला. या प्रकरणी अमोल प्रकाश जाधव विजय प्रकाश जाधव(रा. उपळी) व अर्जुन मोतीराम बडे (रा. गावंदरी, ता. वडवणी) या तिघांविरुद्ध वडवणी पोलीस ठाण्यात दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही धडक कारवाई API वर्षा व्हगाडे, झडख श्याम गायकवाड, पोलीस अंमलदार विभीषण मुंजाळ व भास्कर राऊत यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## शेतकरी बांधवांनी....

भेट द्यावी किंवा आपल्या भागातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही गोरख तरटे यांनी केले आहे.

## माजलगांवात महावितरणचा...

लागत नव्हता. ज्या भागात काम सुरू असेल, त्या भागापुरताच वीजपुरवठा मर्यादित ठेवण्याची पद्धत त्यांनी अवलंबली होती. मात्र सध्या ही पद्धत न वापरता संपूर्ण शहराचा वीजपुरवठा बंद केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकारामुळे रुग्णालये, पाणीपुरवठा व्यवस्था आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असून व्यापाऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. महावितरणने कामाचे योग्य नियोजन करून फक्त संबंधित भागातच वीजपुरवठा बंद ठेवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, महावितरण प्रशासनाने याबाबत स्पष्टीकरण देऊन भविष्यात अशी परिस्थिती टाळावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ३० मिनिटं होरपळत होते १ प्रवासी, ११ जणांचा भीषण अपघातात मृत्यू, प्रत्यक्षदर्शीनं सांगितली थरारक कहाणी

**वृत्तसंस्था**

संध्याकाळची वेळ आणि अचानक वातावरणात घुमला तो हाडांचा थरकाप उडवणारा एक आवाज! कोणाला काही कळायच्या आत एका ट्रकचे ब्रेक फेल झाले आणि नियतीने आपला क्रूर खेळ सुरू केला. समोरून येणाऱ्या बोलेरो आणि ऑल्टोला चिरडत ट्रक थेट डंपरवर आदळला. क्षणार्धात गाड्यांनी पेट घेतला आणि महामार्गावर मृत्यूचा तांडव सुरू झाला. एकीकडे गाड्या जळत होत्या तर दुसरीकडे प्रवासी होरपळत होते. जवळपास ३० मिनिटं हा थरार सुरू होता.

प्रत्यक्षदर्शीनं सांगितला थरार- घटनेच्या वेळी तिथे उपस्थित असलेल्या विजय कुमार नावाच्या प्रत्यक्षदर्शीने डोळ्यांत पाणी आलं. आम्ही धावत गेलो, पण समोरचं दृश्य काळजात धस्स करणारं होतं. बोलेरो आणि कार जळून खाक झाली होती. आतून ओरडण्याचे आवाज येत होते, पण आगीच्या ज्वाळा एवढ्या भीषण



होत्या की जवळ जाणं अशक्य होतं. तब्बल अर्धा तास ते आगीत होरपळत होते. फायर ब्रिगेडला येण्यासाठी अर्धा तास लागला, पण तोपर्यंत सगळं संपलं होतं.''

दोन कुटुंब उद्ध्वस्त- जिगना येथील एक कुटुंब आपल्या चिमुरड्याचं मुंडन करण्यासाठी श्रद्धेनं मैहरला गेलं होतं. सोबत दोन महिला, दोन लहान मुलं आणि घरातील पुरुष आनंदाने घरी परतणाऱ्या या कुटुंबाला काय माहित होतं की हे त्यांचं शेवटचं दर्शन असेल? बोलेरोमध्ये असलेल्या प्रियांका (४२), कार्तिकेय (१८), पियुष (१४), पंकज (४०), बिना (४७), वंदना (४३) आणि अवघ्या ८-९ वर्षांचे शिवा आणि सोनम यांचा या आगीत कोळसा झाला. एका संपूर्ण पिढीचा अंत एका क्षणात झाला.

१० मिनिटं आधीच मदत आली असती तर... अपघात इतका भीषण होता की गाड्यांचा नुसता लोखंडी सांगाडा उरला होता. मृतदेहांची अवस्था पाहून उपस्थितांचे पाय लटपटत होते. अखेर तुटलेल्या नंबर प्लेटवरून पोलिसांनी घरच्यांशी संपर्क साधला. गॅस कटरच्या साहाय्याने गाड्या कापून ते मृतदेह बाहेर काढावे लागले.मदत जर १० मिनिटं आधी आली असती, तर कदाचित परिस्थिती वेगळी असती. पण त्या अर्ध्या तासात आम्ही फक्त उभा राहून त्या जीवांना जळताना पाहण्याशिवाय काहीच करू शकलो नाही. ती लहान मुलं, तो आक्रोश आयुष्यभर विसरता येणार नाही. असं प्रत्यक्षदर्शी गुड्डू यादव यांनी न्यूज १८ शी बोलताना सांगितलं.

पोलिसांनी दिली महत्त्वाची माहिती- एसपी रजत कौशिक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रकचे ब्रेक फेल झाल्यामुळे हा भीषण अपघात झाला. यामध्ये बोलेरोमधील ८ जणांसह दोन्ही कारचे चालक आणि ट्रकच्या क्लिनरचा मृत्यू झाला आहे. ट्रक चालकाची प्रकृती चिंताजनक असून, एकूण ११ जणांना या अपघातात आपले प्राण गमवावे लागले. हा भीषण अपघात उत्तर प्रदेशातील मिर्झापूर इथल्या वाराणसी-रीवा महामार्गावर घडल्याची माहिती मिळाली आहे.

# शिंदेंच्या आमदाराला ३७ वर्षांनी आली जाग!

## 'शिवाजी कोण होता' पुस्तकाच्या प्रकाशकाला घरात घुसून मारण्याची धमकी, पानसरेंचा उल्लेख करत म्हणाले...

**वृत्तसंस्था**

दिवंगत प्राध्यापक गोविंद पानसरे यांनी ३७ वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर लिहलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून आता नवा वाद सुरू झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे सतत वादग्रस्त वक्तव्य करणारे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाच्या नावावर आक्षेप घेतला आहे.संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करून थेट जीवे मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. गायकवाड यांनी शिवाजी महाराजांचा अनादर केल्याचे म्हणत आंबी यांन शिवीगाळ आणि जीवे मारण्याची




धमकी दिल्याची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. शिवाय ही ऑडिओ क्लीप माझीच असल्याचं आमदार गायकवाड यांनी मान्य केलं आहे.

आमदार गायकवाड नेमकं काय म्हणाले?

या ऑडिओ क्लिपमध्ये आमदार संजय गायकवाड म्हणतात की, शिवाजी कोण होता? असा एकरी उल्लेख का केलाय तुम्ही शिवाजी महाराजांना एकेरी बोलता का? त्यावर प्रशांत आंबी म्हणतात की, हे पुस्तक गोविंग पानसरे यांनी लिहिलं आहे.

नंतर गायकवाड म्हणतात : अरे तो कोण आहे? तुला माहितेय ना गोविंग पानसरेचे काय हाल केलेत.

प्रशांत आंबी : हो माहितेय मला.

गायकवाड : मग ब्राह्मण आहे का तू?

आंबी : मी ब्राह्मण नाही.

गायकवाड : जास्त शहाणपणा करू नको मी आमदार संजय गायकवाड आहे. घरात घुसून मारेन साल्या.

आंबी : धमक्या देऊ नका.

गायकवाड : मी व्यवस्थीत बोलतोय तू लिहिलं कसं? तु राहतो कुठं?

आंबी : मी कोल्हापुरात राहतो.

गायकवाड : मी घरात घुसून मारेन. ते म्हणाले नाव आणि बदल तुझी भाषा बदलं, अशी धमकी गायकवाड यांनी दिली.

दरम्यान, प्रशांत आंबी यांनीही संजय गायकवाडांना 'तुम्ही उद्या माझी जीभ कापायला या', असं प्रत्युत्तर दिलं. दरम्यान, या सगळ्या प्रकरणावर गायकवाड यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. गायकवाड म्हणाले, ज्या पद्धतीने त्याने जी मुजोरी ठेवली मी त्याला विचारत असताना तो मला सारखा डिवचतं होता.

म्हणून मी जीभ हासडायची भाषा केली आणि अशा लोकांना शंभर टक्के जीभ हासडायची भाषा केली पाहिजे. शिवाय अशा पुस्तकांमध्ये जी शिवरायांबद्दल एकेरी भाषा वापरली आहे ती आम्ही या महाराष्ट्रात नाही सहन करू शकत, असंही गायकवाड यांनी म्हटलं आहे.

# मित्राच्या बायकोवर बलात्कार, बड्या अधिकाऱ्याच्या मुलीची अब्रु लुटली; 23 वर्षांच्या नराधमाचा 'तो' भयानक प्लॅन उघड

**वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीमध्ये एका आयआरएस अधिकाऱ्याच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या प्रकरणात धक्कादायक आणि संतापजनक माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी याप्रकरणी आरोपी राहुल याला बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्या चौकशीदरम्यान देशाला हादरवणारी माहिती उघड झाली आहे. राहुलने दिल्लीत येण्यापूर्वी राजस्थानच्या अलवरमध्ये आपल्या मित्राच्या पत्नीवर बलात्कार केला होता. राजस्थान पोलीस राहुलचा शोध घेत होते, मात्र तो रुग्णवाहिकेतून दिल्लीला पसार झाला होता. दिल्लीत पोहोचल्यावर त्याने आयआरएस अधिकाऱ्याच्या घराचे कुलूप तोडून मुलीवर अत्याचार केला आणि तिची हत्या केली.

२३ वर्षीय नराधमाच्या या कृत्याने सध्या संपूर्ण देश हादरला आहे. अलवरमध्ये मित्राच्या पत्नीवर बलात्कार करून आरोपी राहुल रुग्णवाहिकेतून दिल्लीत पोहोचला. तिथे त्याने तरुणीवर अत्याचार करून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह घरातच कोंडून ठेवला. या गुन्हेगाराने दोन राज्यांच्या पोलिसांना सळो की पळो करून सोडले होते. मैत्रीच्या नावाखाली केलेला विश्वासघात आणि त्यानंतर केलेली हत्या यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. सध्या राजस्थान आणि दिल्ली पोलीस संयुक्तपणे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

आरोपी राहुल मीणा याला पोलिसांनी अटक केली आहे. तो मूळचा राजस्थानमधील राजगड येथील एका गावातील रहिवासी आहे. तो दिल्लीत एका आयआरएस अधिकाऱ्याच्या घरी नोकर म्हणून काम करत होता, परंतु त्याच्या वर्तनामुळे त्याला कामावरून काढून टाकण्यात आले होते. काम गेल्यामुळे तो गावी परतला होता आणि तिथेच राहत होता. २१ एप्रिल रोजी तो एका मित्रासह लग्नाला गेला होता. त्याने मित्राला लग्नात सोडले आणि काही कारण सांगून तिथून बाहेर पडला. राहुल लग्नातून थेट मित्राच्या घरी गेला आणि तिथे त्याच्या पत्नीवर बलात्कार केला.

रात्री ११ ते १२ च्या सुमारास राहुलने मित्राच्या पत्नीवर अत्याचार करून तिचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याने दुचाकीवरून पळ काढला. तो मुंबई-दिल्ली एक्सप्रेसवेवर आला, तिथे त्याने एक रुग्णवाहिका थांबवली आणि २२ तारखेला तो दिल्लीत पोहोचला. त्यानंतर सकाळी टॅक्सीने तो थेट आयआरएस अधिकाऱ्याच्या घरी गेला. तिथे त्याने अधिकाऱ्याच्या तरुण मुलीवर बलात्कार केला आणि चार्जरच्या केबलने गळा आवळून तिची हत्या केली.

# दहिफळ येथे भीम जयंतीचा जल्लोष: सामाजिक ऐक्याचा प्रेरणादायी सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

समाजप्रबोधन, समता आणि बंधुभावाचा संदेश देणारी भीम जयंती ही केवळ एक उत्सव नाही, तर ती परिवर्तनाची चळवळ आहे. दहिफळ येथे यावर्षीही भीम जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी होत असून, पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये याबाबत विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्सवाची रूपरेषा आकर्षक आणि प्रेरणादायी ठेवण्यात आली आहे. २८ एप्रिल रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे सामाजिक संदेश दिला जाणार आहे. २९ एप्रिल रोजी भीम गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारांची जागृती केली जाईल, तर ३० एप्रिल रोजी भव्य-दिव्य मिरवणुकीने या उत्सवाची सांगता होणार आहे. या तीन दिवसांच्या कार्यक्रमातून केवळ आनंद नव्हे, तर सामाजिक एकतेचा संदेशही दिला जाणार आहे.भीम जयंती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देण्याची, त्यांच्या संघर्षाची आठवण करून देण्याची आणि नव्या पिढीला त्या विचारांनी प्रेरित करण्याची संधी. अशा उत्सवांमुळे समाजातील विविध घटक एकत्र येतात, भेदभाव दूर होतो आणि एकतेची नवी उर्जा निर्माण होते. उत्सव समितीचे अध्यक्ष अशोक जाधव, उपाध्यक्ष अमोल जाधव, सचिव विजय जाधव, कोषाध्यक्ष राम जाधव व मार्गदर्शक विक्रम जाधव यांनी केलेले आवाहन

# बारामती-राहुरी पोट निवडणुकीत किती टक्के लोकांनी केलं मतदान? कोण मारणार बाजी ?



**बारामती । प्रतिनिधी**

पश्चिम बंगालसह ५ राज्यातील विधानसभा निवडणुकीसोबतच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन ठिकाणी पोटनिवडणुका होत आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनाने बारामतीची पोट निवडणूक लागली, तर राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या दुखद निधनाने राहुरीमध्ये निवडणूक होत आहे. आयोगाने दिलेल्या अधिकृत आकेडवारीनुसार, महाराष्ट्रत सायंकाळी ६ पर्यंत बारामतीमध्ये ५९ टक्के, तर राहुरीमध्ये ५६.७२ टक्के मतदानाची नोंद झाली आहे.

पुण्यातील बारामती आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी या दोन मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान झाले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे बारामतीची जागा रिक्त झाली होती. या जागेवर अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार रिंगणात उतरल्या आहेत. तर राहुरीचे भाजप आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर अक्षय कर्डिले नशीब अजमावत आहेत.

बारामती विधानसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत सायंकाळी ६ वाजेपर्यंत ५९.२७ टक्के मतदान झाले. बारामतीमध्ये ३८४५७९ इतके मतदार आहेत, त्यापैकी २०२८०८ लोकांनी मतदानाचा हक्क बजावला. तर राहुरीमध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५६.७२ टक्के मतदान झाले. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज बूथ क्रमांक २३३ काटेवाडी येथे मतदानाचा हक्क बजावला. त्याशिवाय जय पवार, पार्थ पवार, सुनेत्रा पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबाने मतदानाचा हक्क बजावला.

# ९५ टक्के मतदानाने राज्यात निकालाआधी भूकंप, राजकीय विश्लेषकही चक्रावले; बंगालमध्ये सत्तापालटाचे संकेत

**वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या राजकारणात आज म्हणजे २३ एप्रिल २०२६ रोजी नवा इतिहास घडला आहे. बंगाल विधानसभा निवडणूक २०२६ च्या पहिल्या टप्प्यात १५२ जागांसाठी झालेल्या मतदानाने आतापर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत.

निवडणूक आयोगाच्या ताज्या आकडेवारीनुसार सायंकाळी ६ वाजेपर्यंतच मतदानाचा टक्का ९१.३५ टक्क्यांवर पोहोचला होता. अनेक मतदान केंद्रांवर ६ नंतरही लांबच लांब रांगा दिसल्यामुळे अंतिम टक्का ९० ते ९५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे. बंगालच्या निवडणूक इतिहासातील हे आतापर्यंतचे सर्वाधिक मतदान मानले जात आहे. जर २०२१ सालाशी तुलना केली तर त्या वेळी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत एकूण ८२.२९ टक्के मतदान झाले होते. त्यावेळीही मोठ्या मतदानाला सत्ताबदलाची लाट मानले गेले होते. मात्र ममता बॅनर्जी यांनी प्रचंड बहुमतासह पुनरागमन केले होते. मात्र २०२६ च्या पहिल्याच टप्प्यात मतदानाचा टक्का ९० टक्क्यांच्या जवळ जाणे, हे जनतेच्या मनात खोल नाराजी किंवा मोठ्या बदलाची चाहूल असल्याचे संकेत मानले जात आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते मतदानाचा टक्का अचानक वाढल्यास तो



बहुतांश वेळा सत्ताधाऱ्यांच्या बाजूने किंवा त्यांच्या विरोधातील मोठ्या लाटेचा संकेत देतो.

२०२१ चा विक्रम मोडला, सत्तेची हवा बदलेल?

पहिल्या टप्प्यात ज्या १५२ जागांवर मतदान झाले, त्यांचा २०२१ चा निकाल अत्यंत रोचक होता. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने ४६.९० टक्के मते मिळवत ९२ जागांवर विजय मिळवला होता. तर भाजपने ३९.६५ टक्के मतांसह ५९ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसला ४.३३ टक्के मते मिळाली होती, तर डाव्या पक्षांना ३.२६ टक्के मते मिळाली होती.

बंपर मतदानाने कोण 'बमबम'? जोरदार मतदानानंतर दोन्ही बाजूंनी विजयाचे दावे अधिक तीव्र झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका सभेत सांगितले की, बंपर मतदान हे या गोष्टीचे प्रतीक आहे की बंगालमधील जनतेचा 'भय' आता 'विश्वासात' बदलला आहे. भाजपचा दावा आहे की सायलेंट मतदार आणि महिला यावेळी मोठ्या प्रमाणात मतदानासाठी बाहेर पडल्या आहेत आणि त्याचा फायदा त्यांना होऊ शकतो.

ममता विरुद्ध मोदी, कोण जड?

दुसरीकडे तृणमूल काँग्रेसचे म्हणणे आहे की उच्च मतदान हे त्यांच्या मजबूत संघटनशक्तीचे आणि ममता बॅनर्जी यांच्या लक्ष्मी भंडारसारख्या जनकल्याणकारी योजनांवर जनतेच्या ठाम विश्वासाचे द्योतक आहे. टीएमसीच्या मते ग्रामीण आणि अल्पसंख्याक मतदारांनी 'बाहेरील' शक्तींना रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे. सध्या दोन्ही पक्ष स्वतःला आघाडीवर असल्याचे सांगत असले तरी पडद्यामागील अस्वस्थता स्पष्ट दिसून येत आहे.

दुसऱ्या टप्प्यासाठी काय संकेत?

पहिल्या टप्प्यातील या १५२ जागा उत्तर बंगाल आणि दक्षिण बंगालमधील अनेक महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या आहेत. हा टप्पा निर्णायक मानला जात आहे कारण तो राज्यातील अर्ध्याहून अधिक विधानसभा जागांचा कल ठरवू शकतो. जर पहिल्या टप्प्यात एखाद्या पक्षाच्या बाजूने स्पष्ट वातावरण दिसले, तर त्याचा 'डोमिनो इफेक्ट' २९ एप्रिल रोजी होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील १४२ जागांवरही दिसू शकतो.

झारग्राम, मेदिनीपुर आणि बांकुरा या भागांमध्ये झालेल्या प्रचंड मतदानाने हे स्पष्ट झाले आहे की यावेळचा बंगाल निवडणूक सामना एका मुद्द्यावर नाही, तर अस्मिता आणि अस्तित्वाच्या लढाईत रूपांतरित झाला आहे. पंतप्रधान मोदी यांचा 'झालमुडी' फॅक्टर किती प्रभावी ठरला, हे निकालानंतर स्पष्ट होईल. मात्र या बंपर मतदानाने सर्व जुने विक्रम मोडले असून आजच्या मतदानाने एवढे नक्की केले आहे की बंगालच्या जनतेने आपला निर्णय पूर्ण ताकदीने ईव्हीएममध्ये नोंदवला आहे.

आता सर्वांचे लक्ष ४ मेकडे लागले आहे. पंतप्रधान मोदी यांची 'झालमुडी पॉलिटिक्स' आणि मोठ्या प्रमाणातील मतदान ममता बॅनर्जी यांचा किल्ला वाचवेल की भाजपचे 'सोनार बांग्ला'चे स्वप्न साकार करेल, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

# निष्ठावंत अनिलदादा जगताप यांना विधान परिषदेत संधी देण्याची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीत शिवसेनेच्या कोट्यातील किमान एक जागा बीड जिल्ह्यासाठी राखीव ठेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना विधान परिषद या जागेसाठी संधी द्यावी, अशी ठाम मागणी शिवसेना जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी केली आहे. तसेच या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिवसैनिकांना न्याय द्यावा आणि संघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने मदत करावी. असे आवाहनही त्यांनी केले आहे. अनिलदादा जगताप यांनी १९८६ पासून शिवसेनेत कार्य करत तब्बल चार दशकांहून अधिक काळ पक्षाशी निष्ठा ठेवली आहे. शिवसैनिक, शाखाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख ते जिल्हाप्रमुख असा त्यांचा प्रवास असून नगरसेवक, जिल्हा परिषद आणि विधानसभा अशा विविध निवडणुकाही त्यांनी पक्षाच्या चिन्हावर लढवल्या आहेत. वयाच्या सोळाव्या वर्षापासून शिवसेना हाच त्यांचा परिवार राहिला असून त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि निष्ठावान कार्याचा विचार करता त्यांना विधान परिषदेत संधी देणे योग्य ठरेल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, एकेकाळी बीड जिल्ह्यातील सातपैकी चार मतदारसंघांवर शिवसेनेचे वर्चस्व होते. माजलगाव, बीड आणि गेवराईसारख्या मतदारसंघांतून शिवसेनेचे आमदार निवडून येत होते. मात्र बदलत्या राजकीय समीकरणांमुळे हळूहळू हे सर्व मतदारसंघ पक्षाच्या हातातून निसटले. अखेरीस बीड विधानसभा हा एकमेव मतदारसंघ उरला होता, पण २०२४ च्या निवडणुकीत तोही महायुती धर्मपालनेत इतर पक्षाकडे गेल्याने जिल्ह्यातील शिवसैनिक पूर्णपणे निराश झाले आहेत. सध्याच्या परिस्थितीत जिल्ह्यात शिवसेनेचा एकही लोकप्रतिनिधी नसल्याने कार्यकर्त्यांना विविध शासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पोलीस स्टेशन, तहसील, रुग्णालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील कामांमध्ये समन्वयाचा अभाव जाणवत असून मित्रपक्षांकडूनही अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची भावना कार्यकर्त्यांत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याला एक सक्षम, संवेदनशील आणि हक्काचा लोकप्रतिनिधी मिळणे अत्यावश्यक झाले असून अनिलदादा जगताप यांना विधान परिषदेत संधी दिल्यास संघटना अधिक मजबूत होईल आणि शिवसैनिकांना दिलासा मिळेल, असा विश्वास सुनिल सुरवसे यांनी बीड जिल्ह्याच्या तमाम शिवसैनिकांच्या वतीने व्यक्त केला आहे. याबरोबरच सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या कष्टाचा सन्मान करणारे शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब आणि खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब हे या मागणीचा सकारात्मक विचार करून बीड जिल्ह्याला न्याय देतील, अशी अपेक्षा शिवसेना बीड जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी व्यक्त केली आहे.

## चिंचाळा येथे अवैध दारू विक्रीविरोधात तक्रार; ऑल इंडिया पँथर सेनेचा आंदोलनाचा इशारा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचाळा गावात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुका अध्यक्ष त्रिंबक पायके यांनी बुधवारी वडवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. निवेदनानुसार, गावात अंदाजे नऊ ते दहा ठिकाणी खुलेआम अवैध दारूची विक्री केली जात आहे. यातील काही दुकाने जिल्हा परिषद शाळेजवळ असल्याने विद्यार्थ्यांवर




व नागरिकांवर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. गावात दारू विक्रीमुळे भांडणे, वाद-विवाद आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील शांतता व सुरक्षितता धोक्यात येत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित दुकाने त्वरित बंद करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, जर प्रशासनाने लवकरात लवकर योग्य ती पावले उचलली नाहीत, तर ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने पोलीस ठाण्यासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## मार्च २०२६ अखेरचे मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ई-आर १ सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सार्वजनिक क्षेत्रातील केंद्र व राज्य शासन यांची सर्व कार्यालये,अंगिकृत उद्योग / व्यवसाय / महामंडळे,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद / पंचायत समिती, महानगर पालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील २५ किंवा अधिक लोक काम करतात अशा सर्व आस्थापना, उद्योग, व्यापार, व्यवसाय, कारखाने यांना सेवायोजन कार्यालये ( रिक्तपदाची सुचना देणे सक्तीचे ) कायदा १९५९ व त्या अंतर्गत नियमावली १९६० नुसार त्रैमासिक विवरणपत्र ई-आर १ माहे मार्च २०२६ तिमाही संपल्यानंतर ३० दिवसाच्या आत (३० एप्रिल,२०२६ पर्यंत) सादर करणे बंधनकारक आहे. या प्रमाणे नियोक्त्यांच्या लॉग-इन मध्ये विवरणपत्र www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

याप्रमाणे नियुक्त्यांची डिसेंबर २०२५ या तिमाहीचे विवरणपत्र ई-आर १ दि. ३० एप्रिल,२०२६ पर्यंत पर्यंत सादर करावे.यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in वेबसाईट ओपन करुन एम्प्लॉयर ( लीस्ट अ जॉब ) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉग इनमध्ये नियोक्त्यांचा युजर आय डी व पासवर्ड वापरुन लॉग इन करुन ईआर रिपोर्ट मधील ई-आर १ या ऑप्शनवर क्लीक करुन ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

यासाठी काही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत (०२४४२) २९९११६ या कार्यालयाच्या दूरध्वनीवर संपर्क कराव/ राजु कटक (क. कौ.वि.मा. अ.) यांच्याशी संपर्क करावा. मो.नं. ७०२०४१४२३१ सेवायोजन कार्यालये (रिक्तपदाची सुचना देणे सक्तीचे) कायदा १९५९ व त्या अंतर्गत नियमावली १९६० मधील तरतुदी नुसार वरील प्रमाणे सर्व आस्थापनांनी मार्च २०२६ या अखेर आपल्या वेतन पटावर असलेल्या सर्व मनुष्यबळाची माहिती ई-आर १ विवरणपत्र ३० एप्रिल,२०२६ पर्यंत पुर्वी वरील वेबसाईटवर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे, यात कसूर झाल्यास कसूरदार आस्थापनांवर कायदेशिर कारवाई होऊ शकेल, याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,सहायक आयुक्त समाधान किरवले यांनी केले आहे.

# आमदार संजय गायकवाड यांना अटक करुन आमदारकी रद्द करा : भारतीय कम्युनिस्ट पक्षाची मागणी

### कोल्हापूर स्थित पुस्तक वितरक प्रशांत आंबी यास परिवारासह जीवे मारण्याची धमकी दिली

**बीड । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील आमदार संजय गायकवाड यांनी कोल्हापूरस्थित पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरुन आई,बहिण,आणि पत्नीचा उल्लेख करुन,अतिशय अश्लील-अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन,घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांची चौकशी करुन अटक करावी आणि त्यांची आमदारकी सुद्धा रद्द करावी ; अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांना बीड जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनामध्ये तीव्र निषेध नोंदवून म्हटले आहे की,

शिवाजी कोण होता हे पुस्तक ३८ वर्षांपुर्वी दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहीले आहे.मराठी सहीत अन्य भाषांमधील लाखों प्रती वाचकांनी वाचलेल्या आहेत.मात्र,या पुस्तकाचे शिर्षक शिवाजी महाराजांचा एकेरी नावाने उल्लेख करीत असल्याचे म्हणत पुस्तकाचे वितरण,विक्री करीत असलेले प्रशांत आंबी यांना बेइज्जत करुन जीवे मारण्याची आमदाराने धमकी देणे म्हणजे चक्क गुंडगिरीच आहे.

तद्वतच,या धमकी दरम्यान,या आमदाराने गोविंद पानसरेचे कसे हाल केले,तसेच तुझे सुद्धा करतो असे म्हटले आहे. यावरून,गोविंद पानसरे यांच्या खुनामध्ये या आमदाराचा



देखिल सहभाग असावा,अशी रास्त शंका येते.करिता,त्या केस मध्ये सुद्धा यांना सहआरोपी करवून घ्यावे,रितसर चौकशी करावी.यापूर्वीही,

सदर आमदाराने आमदार निवासातील कैन्टीन मधील सामान्य कामगाराला शिवीगाळ करुन मारहाण केलेली आहे.

कायदेमंडळाचा सदस्य असलेल्या व्यक्तीनेच कायदा पयदळी तुडविला असुन दहशत निर्माण केल्यामुळे या प्रकरणात चौकशी करुन

गुन्हा नोंदवावा,अटक करावी,त्यांची आमदारकीची पात्रता रद्द करावी,आणि प्रशांत आंबी व त्यांच्या कुटुंबीयांना योग्य सक्षम संरक्षण देण्यात यावे,या मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनावर राज्य सचिव मंडळ सदस्य कॉ नामदेव चव्हाण, राज्य कौन्सिल सदस्य -कॉ भाऊ प्रभाळे,कॉ ज्योतिराम

हुरकुडे ,प्राचार्य कॉ राजकुमार कदम,-

किसान सभेचे अध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे,

कॉ भिमराव चव्हाण वकील, कॉ फिडेल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, कॉ रामदास कदम,अझहर शेख, कॉ भिमराव जगताप, कॉ यासीन शेख,कॉ अजय हुन्बे, यांच्या स्वाक्ष-या आहेत.

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

वाचनाचे महत्त्व रुजवण्यासाठी आणि जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या अंतर्गत काठोडा (ता. जि. बीड) येथील मातोश्री कॅम्पसमधील 'मातोश्री ग्रामीण रुग्णालय' येथे विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जागतिक पुस्तक दिवस का साजरा केला जातो, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. वाचन संस्कृती वाढावी, लहानपणापासूनच पुस्तकांबद्दल आवड निर्माण व्हावी आणि जगभरातील थोर लेखकांच्या साहित्याचा व त्यांच्या विचारांचा सन्मान व्हावा म्हणून दरवर्षी २३ एप्रिल २०२६ रोजी हा दिवस साजरा केला जातो, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे पुस्तके कशी माणसाचे जीवन घडवतात आणि चांगला विचार देतात,


मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

**बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.**

**जनरेटर खरेदी निविदा**

महाविद्यालयाला १२५ के. व्ही. डिजेल जनरेटर (DG Set) खरेदी व बसवीणे या कामासाठी पात्र व अनुभवी पुरवठादाराकडुन सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. इच्छुक कंत्राटदारांनी आवश्यक कागदपत्रांसह निविदा अर्ज दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सायं. ०५.०० पर्यंत महाविद्यालयाच्या भांडार विभागात सादर करावी.

**नोट :** १) महाविद्यालय कोणतीही निविदा स्वीकृत किंवा नामंजूर करण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवते.

(स्वाक्षरीत)
**प्राचार्य**
**बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.**



**दैनिक मराठवाडा पत्र** दि. १८/०२/२०२५

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**Older name** - KULKARNI ONKAR CHANDRAKANTRAO

**New name** - KULKARNI ONKAR CHANDRAKANT

**Address:** S/O: Chandrakant Kulkarni, Kabad Galli, Beed, Dist. Beed, Maharashtra - 431122

**Mobile- 7385548028**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**मा. वसंत एस. यादव साहेब. ८ से सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: ६२४/२०२६**

**सुमन फड व इतर विरुद्ध निरंक**

अर्जदार- **१) सुमन भ्र. मनसुब फड, वय ६२ वर्ष, धंदा-घरकाम. रा.तांदळवाडी (भिल्ल), ता. जि. बीड २) दिक्षा पि.महादेव फड, वय २० वर्षे, धंदा घरकाम, रा.तांदळवाडी (भिल्ल), ता.जि. बीड**

ज्याअर्थी मयत नामे महादेव पि. मनसुब फड रा. तांदळवाडी (भिल्ल) ता.जि.बीड हे दि. ०७.०८.२०२५ रोजी मौजे तांदळवाडी (भिल्ल) ता. जि.बीड येथे मयत झाले आहेत.

असे की, अर्जदार नं. १ ही मयत नामे महादेव पि. मनसुब फड यांची आई असून अर्जदार नं. २ ही मयताची मुलगी आहे.

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर् अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे महादेव पि. मनसुब फड रा. तांदळवाडी (भिल्ल) ता. जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज १७-०४-२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख: १७.०६.२०२६**
**(मार्फत ॲड. बी. के. गायकवाड . बीड)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**



**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ५० / २०२६**

**शहाबाई भ्र. लक्ष्मण सोनवणे वि. निरंक**

अर्जदार : **१) शहाबाई भ्र.लक्ष्मण सोनवणे वय ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड. २) सुदाम पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ४४ वर्ष, धंदा - शेती, रा. सदर, ३) संदिप पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ३० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ४) मंगलबाई भ्र. भास्कर तांदळे वय - ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. वंजारवाडी ता.जि. बीड. ५) लता भ्र. बाजीराव थोरवे, वय - ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड**

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ऑक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत

ज्यापोक्षा मयत नामे लक्ष्मण पि.कारभारी सोनवणे, यांचा मृत्यू दि. १६-०९-२०२५ रोजी मौजे खांबा पो. खालापुरी ता.शिरुर (का)जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा धैवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक१६.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर **प्रकरणात पुढील तारीख ०८.०५.२०२६ ही आहे.**

**(ॲड. डी. एम. रोटे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**



**जाहिर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ५८० / २०२६**

CNR No. MHBI02000011322026

**अतुल महादेव भोसले वि. निरंक**

अर्जदार :- **१. अतुल पि. महादेव भोसले, वय - ३७ वर्ष, धंदा शेती, रा. पोखरी घाट पो. लिंबागणेश ता. जि.बीड २. राहुल पि. महादेव भोसले, वय-३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३. वैशाली भ्र. विनोद वाघमारे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौदाना ता. जि. बीड. ४. त्रिशाला भ्र. राजाराम वाघमारे, वय-३० वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेर वडगाव ता. जि. बीड**

**विरुध्द निरंक**

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात महादेव मोहन भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत महादेव मोहन भोसले यांचा मृत्यु दिनांक २५/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत महादेव मोहन भोसले यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख ११ /०६/ २०२६**

आज दिनांक १३ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत ॲड. की. बी. पारगांवकर)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**



**जाहीर लिलाव**

**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ शाखा बीड**
**(अवसायनात)**
Email:rajasthanimultistatecooperativ@gmail.com

जा.क्र./मु.का./२०२५-२६. दिनांक २३/०४/२०२६

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ या पतसंस्थेच्या बीड शाखेमध्ये उपलब्ध असलेली तिजोरी, लाकडी फर्निचर, इतर सर्व डेड स्टॉक जशे आहे तसेच व विनातक्रार या तत्वावर, आहे त्या स्थितीत विक्रीसाठी निविदा मागविण्यात येत आहे. यासाठी इच्छुकांनी दि. १०/०५/२०२६ पर्यंत अवसायक यांचेकडे सिलबंद निविदा सादर करावी. सर्वाधिक रकमेची निविदा मंजूर करण्यात येईल व संबंधीतास त्या बाबत कळविण्यात येईल. नियमाप्रमाणे अथवा अति कमी रकमेची निविदा प्राप्त झाल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार अवसायकास राहील. अधिक माहितीसाठी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव यांच्याशी संपर्क करावा.

(स्वाक्षरीत)
**सुरज उत्तमराव जगदाळे**
**अवसायक**
**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ**

# माविमची साथ आणि परिश्रमाच्या जोडीतून अगरबत्ती उद्योगाचा दरवळ

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील ईसरवाडी येथील वर्षा अशोक ढाकणे यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत एकता लोकसंचालित साधन केंद्राच्या मार्गदर्शनातून अगरबत्ती व्यवसाय उभारून स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला आहे.

वर्षा ढाकणे या स्वामी समर्थ महिला बचत गटाच्या सदस्य असून त्यांचे कुटुंब दोन मुली व एक मुलगा असे आहे. पती कंपनीत नोकरीला असून त्या स्वतः मजुरी करत होत्या. मात्र या उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च भागवणे कठीण जात होते. त्यामुळे त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीला केवळ १६०० रुपयांमध्ये अगरबत्तीचा कच्चा माल आणून त्यांनी छोट्या प्रमाणात विक्री सुरू केली. व्यवसायाला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर त्यांनी मशीन घेण्याचा विचार केला. यासाठी आवश्यक भांडवल नसल्याने त्यांनी माविम अंतर्गत एकता लोकसंचालित साधन केंद्राच्या माध्यमातून बचत गट स्थापन केला.

गटातून अंतर्गत कर्ज मिळाल्यानंतरही मोठ्या गुंतवणुकीसाठी अधिक निधीची गरज होती. यासाठी साधन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली आयसीआयसीआय बँकेकडून सुमारे २ लाख रुपयांचे कर्ज मिळाले. या निधीतून त्यांनी अगरबत्ती तयार करण्यासाठी मशीन, मिक्सर व ड्रायर खरेदी करून उत्पादन सुरू केले.

सध्या त्यांच्या उद्योगातून दररोज ३० ते ५० किलो अगरबत्ती उत्पादन होते. वाढत्या मागणीमुळे त्यांनी घाऊक विक्रीही सुरू केली असून महिन्याला सुमारे २००० किलो उत्पादन केले जाते. या व्यवसायातून त्यांना दरमहा ४० ते ५० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.

या उत्पन्नातून त्यांनी अडीच एकर शेती तसेच एक प्लॉट खरेदी केला आहे. आज त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्या असून इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

माविम आणि एकता लोकसंचालित साधन केंद्राच्या वेळेवर मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच हे यश मिळाल्याचे त्या सांगतात. महिलांनीही उद्योगधंद्यात पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.



# कारागृहातील मैत्रीचा क्रूर अंत; इंस्टाग्रामवर ज्यांचे स्टेटस ठेवले, त्यांनीच केला गुन्हेगाराचा घात

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

कारागृहातील ओळखीनंतर ज्यांना मित्र मानले, ज्यांच्या सोबत पार्टी केल्यानंतर छायाचित्र काढून इंस्टाग्रामवर स्टेटस ठेवले, त्यांनीच गुन्हेगार रोहित ऊर्फ करण रवी मस्के (२५, रा. राजनगर) याचा केवळ जुन्या वादाचा खोचकपणे उल्लेख केल्याने घात केला. विशेष म्हणजे, यातील मृतासह मारेकरीदेखील पुंडलिकनगर, मुकुंदवाडीत फोफावलेल्या गुन्हेगारीच्या टोळ्यांचे सदस्य आहेत. मृत रोहितवर तब्बल ८ गंभीर स्वरूपाचे, तर इतरांवर हत्येचा प्रयत्न, दरोड्याचे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.




गेल्या दहा वर्षांमध्ये स्थानिक पोलिसांच्या गुन्हेगारांसोबतची ऊठबस व निष्क्रियतेमुळे पुंडलिकनगर, मुकुंदवाडीत गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात फोफावली. अनेक युवक गुन्हेगारीकडे वळले. सोशल मीडियावर राजरोस शस्त्र, गुन्ह्यांचे उदात्तीकरण सुरू झाले. नशेखोरी वाढली. आठ दिवसांपूर्वी पुंडलिकनगरमध्ये कुख्यात गुन्हेगार पवन दिवेकर, नीलेश रांजणेच्या टोळ्यांमध्ये गोळीबार झाला. त्याच परिसरात पुन्हा गुन्हेगारांच्या पाट्यां अन् हत्येमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. मंगळवारी रात्री या सर्व गुन्हेगारांनी पार्टी करण्याचे ठरवले होते. साईनगरमध्ये पार्टी झाल्यानंतर हे शिवाजीनगरमधील एका मैदानात बसले आणि तेथे ही घटना घडली.

२०२३ मधील हल्ला, खंडणीनंतर आला चर्चेत

–मार्च २०२३ मध्ये कुख्यात गुन्हेगार मुकेश साळवे, विकी ऊर्फ हेल्मेट सोनकांबळे, मुकेश ऊर्फ मुक्या साळवे, बालाजी पिवळ या टोळीने खंडणी मागून व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला केला होता. यात रोहितसह 'मकोका' अंतर्गत सर्वांना अटक झाल्यानंतर २०२५ ऑगस्टनंतर सर्व जामिनावर सुटले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मोफत ऑनलाईन योग प्रशिक्षण; नोंदणी करण्याचे आवाहन

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

'आंतरराष्ट्रीय योग दिन' येत्या २१ जून रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्या वतिने १०० दिवसांचा विशेष 'योग महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचा एक भाग म्हणून, मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगा आणि हॅबिल्ड हेल्थ टेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने १४ दिवसांचे मोफत ऑनलाइन योग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी, आरोग्य कर्मचाऱ्यांनी व योगप्रेमींनी या उपक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे स्वरूप व नोंदणी: या मोहिमेअंतर्गत सर्व सामान्य नागरिक, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि आयुष संस्थांमधील योग प्रशिक्षकांना ऑनलाइन




माध्यमातून योगाभ्यास शिकता येणार आहे. नोंदणीसाठी लिंक: https://moa.habit.yoga?ref=Maharashtra , टोल-फ्री क्रमांक: १८००३१५७००८ (नोंदणीसाठी या क्रमांकावर संपर्क साधता येईल) सूचना: नोंदणी केल्यानंतर व्हॉट्सपवर प्राप्त होणाऱ्या पुढील सूचनांचे पालन करावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी सांगितले की, योग हा निरोगी जीवनाचा आधार आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत योग पोहोचवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याप्रती जागरूक राहावे.

तसेच, जिल्हा आयुष अधिकारी डॉ शेख शकील अहमद यांनी जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवून जास्तीत जास्त नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. 'निरोगी गाव, निरोगी देश' हे स्वप्न साकारण्यासाठी योगाचा अवलंब करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मतदार यादी मॅपींगसाठी जिल्हाधिकाऱ्यांची थेट मतदारांशी भेट

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये लवकरच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा होणार असून, त्या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यात मतदार मॅपींगच्या कामाला वेग देण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष मतदारांशी संवाद साधत मॅपींगच्या कामकाजाची पडताळणी केली. जिल्ह्यात मतदार मॅपींगची प्रक्रिया दिनांक २० जानेवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ९२-वसमत मतदारसंघात ८७.१७ टक्के, ९३-कळमनुरी मतदारसंघात ९०.२० टक्के आणि ९४-हिंगोली मतदारसंघात ८७.७१ टक्के काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्याचा एकूण प्रगती दर ८८.३६ टक्के असून अद्याप सुमारे १ लाख १४ हजार मतदारांचे मॅपींग बाकी आहे. कामकाजात समाधानकारक प्रगती न झाल्यामुळे ५५ टक्क्यांपेक्षा कमी मॅपींग असलेल्या १२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना नुकतीच कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मतदार मॅपींग १०० टक्के पूर्ण करण्यासाठी दिनांक २५ व २६ एप्रिल रोजी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या क्षेत्रात दिवसभर काम करून ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, नायब तहसीलदार सिताराम साळसुंदर व मंगला मोरे आदी अधिकारी उपस्थित होते.

# विजेचा दररोज लपंडाव, ऐन लग्नसराईत अघोषित भारनियमनाने बाजारपेठेत 'शिमगा'

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

उन्हाचा पारा ४१ अंशांवर जाऊन पोहोचल्याने बुधवारी बाजारपेठेत वर्दळीवर त्याचा परिणाम दिसून आला. यामुळे दिवसभर व्यापारी ग्राहकांची प्रतीक्षा करताना दिसून आले. सायंकाळी खरेदीसाठी ग्राहक घराबाहेर पडले आणि नेमके याच वेळी मुख्य बाजारपेठेतील विद्युत पुरवठा खंडित झाला.

हे काही एका दिवसाचे नव्हे तर मागील २० दिवसांपासून हीच समस्या येत आहे. सायंकाळीही वीज खंडित होत असून, ऐन लग्नसराईत व्यावसायिकांवर 'संक्रांत' ओढावली आहे. वेळेच्या आधी लाइट बिल भरूनही विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने व्यापाऱ्यांमध्ये संताप आहे.

महिनाभराच्या खंडानंतर लग्नसराईला सुरुवात झाली आहे. या हंगामात दररोज कोट्यवधींची उलाढाल होत असते. मात्र, मागील २० दिवसांपासून मान्सूनपूर्व कामाच्या नावाखाली भारनियमन सुरू आहे. कोणतीही पूर्वकल्पना न देता ऐन ग्राहकीच्या वेळी विद्युत पुरवठा खंडित केल्या जात असल्याने नुकसान होत आहे. ज्यांच्याकडे जनरेटर नाही त्या दुकानात असलेले ग्राहक थोड्यावेळ लाइटची वाट पाहून खरेदी न करता उठून जात आहेत.

भारनियमनाचा फटका कोणत्या भागांना?

उस्मानपुरा, क्रांती चौक, पैठणगेट, टिळकपथ, औरंगपुरा, गुलमंडी, रंगारगल्ली, मछलीखडक, सिटीचौक, सराफा बाजार, निरालाबाजार व आसपासच्या परिसरात वीजपुरवठा दररोज खंडित होत आहे.

रोज सायंकाळीच बत्ती 'गुल' – भारनियमन केल्यास पहिले मोबाइलवर मेसेज येत असे. पण, आता दिवसातून तीन ते चार वेळा अघोषित भारनियमन केले जात आहे. महावितरण अशी कोणती दुरुस्ती करते की सायंकाळी मुख्य बाजारपेठेतील विद्युत पुरवठा खंडित करावा लागत आहे? –योगेंद्र मुगदिया, व्यापारी

सिंधी कॉलनीत तीनदा गेली लाइट– बुधवारी सिंधी कॉलनीत दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान तीन वेळा विद्युत पुरवठा खंडित झाला. तसेच मछलीखडक येथे सायंकाळी ६:२५ वाजता लाइट गायब झाली. संपूर्ण व्यवसायाचा बट्ट्याबोळ झाला. मागील २० दिवसांपासून हे असेच सुरू आहे. –रोमी छाबडा, व्यापारी

जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा– सर्व व्यापारी वेळेच्या आत लाइट बिल भरत असतात. काही कारणास्तव एखाद्या व्यापाऱ्याकडून लाइट बिल भरल्या गेले नाही तर दुकानातील विद्युत पुरवठा खंडित केला जातो. आता ऐन हंगामात दिवसा व सायंकाळी लाइट नाही. दररोज व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फटका व मानसिक ताण सहन करावा लागत असून, यास जबाबदार असणाऱ्या महावितरणच्या कामाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. –लक्ष्मीनारायण राठी , उपाध्यक्ष, व्यापारी महासंघ

लाइट गेली की दुकानातून ग्राहक उठून जातोय– दिवस असो की रात्र लाइट गेली की, उकाड्यामध्ये ग्राहक जास्त वेळ बसत नाही. ते सरळ खरेदी न करता दुकानातून उठून जात आहे. ही माझ्या एकट्या दुकानाची नव्हे तर अनेक दुकानात हीच परिस्थिती आहे. मान्सूनपूर्व कामाच्या नावाखाली सुरू केलेले अघोषित भारनियमन बंद करा.


–उदय साहूजी, व्यापारी

# बकवालनगर, वाळूज येथून तरुणी बेपत्ता

## शोध लागल्यास पोलीस स्टेशनला कळविण्याचे आवाहन

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

वाळूज परिसरातील युवती आपल्या आत्याकडे चालले असे सांगुन १४ वर्षीय युवती निघून गेली असून याबाबत वाळूज पोलिस स्टेशनमध्ये हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. याबाबत तक्रारदार पांडुरंग नामदेवराव सुर्यवंशी रा.बकवाल नगर वाळूज, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १४ एप्रिल रोजी वाळूज पो.स्टे ला तक्रार दिली आहे .यात त्यांची मुलगी रुपाली मारोती पांडव ,राहणार वाळूज ही दि.०७ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता घरात वडीलांस आत्याकडे जाते असे सांगून गेली. घरी परत न आल्याने तीचा शोध घेतला असता ती सापडली नाही. बेपत्ता युवतीचे वर्णन– रुपाली मारोती




पांडव, उंची-साडेचार फुट ,रंग-गोरा,नाक-सरळ,डोळे-काळे,केस-काळे व व्यवस्थित, गुलाबी टॉप व पांढरी पँट असे आहे. या वर्णनाची युवती कोणास आढळल्यास वाळूज पोलीस स्टेशन येथे सदरील ०२४०-२२४०५६० फोन क्रमांक आणि, हवलदार बी.एस.शेळके, मोबाईल क्रमांक ९८८१०२६५९९ यावर माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक, वाळूज पोलीस स्टेशन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.


## जाहीर लिलाव

**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.**
**परळी वैजिनाथ शाखा छत्रपती संभाजीनगर**
(अवसायनात)
Email:rajasthanimultistatecooperativ@gmail.com

जा.क्र./मु.का./२०२५-२६. दिनांक २३/०४/२०२६

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ या पतसंस्थेच्या छत्रपती संभाजी नगर येथील कॉर्पोरेट शाखेमध्ये उपलब्ध असलेली तिजोरी, लाकडी फर्निचर, इतर सर्व डेड स्टॉक जशे आहे तसेच व विनातक्रार या तत्वावर, आहे त्या स्थितीत विक्रीसाठी निविदा मागविण्यात येत आहे. यासाठी इच्छुकांनी दि. १०/०५/२०२६ पर्यंत अवसायक यांचेकडे सिलबंद निविदा सादर करावी. सर्वाधिक रकमेची निविदा मंजूर करण्यात येईल व संबंधीतास त्या बाबत कळविण्यात येईल. नियमा प्रमाणे अथवा अति कमी रकमेची निविदा प्राप्त झाल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार अवसायकास राहील. अधिक माहितीसाठी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव यांच्याशी संपर्क करावा. (स्वाक्षरीत)

**सुरज उत्तमराव जगदाळे**
**अवसायक**
**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.**
**परळी वैजिनाथ**


# आजीने पिस्तुल हिसकावलं पण शैलाने प्रियकराची पत्नी जीव सोडत नाही तोपर्यंत मारत होती

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

मागील काही दशकांपासून नवरा बायकोमध्ये तिसरा आणि तिच्या एंट्रीमुळे संसाराची राखरांगोळी झाल्याच्या घटना घडत आहे. नुसता संशय घेऊन नवऱ्याने बायकोची हत्या केल्याच्या घटना वारंवार घडत आहे. पण, छत्रपती संभाजीनगरमध्ये एक वेगळीच घटना समोर आली आहे. एका महिलेनं घरात घुसून प्रियकराच्या पत्नीची भरदिवसा हत्या केली. धक्कादायक म्हणजे, आरोपी महिलेनं आधी पिस्तूल रोखलं आणि नंतर चाकूने सपासप वार करून या महिलेची हत्या केली.



छत्रपती संभाजीनगरचा बजाजनगर परिसर. आज सकाळी नेहमीप्रमाणे गजबजलेलं होतं. पण साई श्रद्धा पार्कयेथील एका घरात जे घडलं, त्याने संपूर्ण मराठवाडा हादरला. ४० वर्षांच्या साधना सोनपेटकर यांची त्यांच्याच घरात घुसून हत्या करण्यात आली. हत्या करणारी दुसरी तिसरी कोणी नसून, त्यांच्या पतीची जुनी मैत्रीण म्हणजेच शैला सोनार होती. मृत साधना यांचे पती महेंद्र सोनपेठकर आणि आरोपी शैला सोनार यांच्यात पूर्वी संबंध होते. या वादातून शैलाने यापूर्वी महेंद्र यांच्यावर बलात्काराचा गुन्हाही दाखल केला होता. संबंध पूर्णपणे तुटल्याच्या रागातून हे हत्याकांड घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

आजीने पिस्तुल हिसकावलं पण... सकाळी शैला सोनार ही पिस्तूल आणि चाकू घेऊन थेट साधना यांच्या घरात घुसली. यावेळी घरात साधना आणि त्यांची वयस्कर आजी होती. जुन्या वादातून तिघांमध्ये झटापट सुरू झाली. संतापलेल्या शैलाने साधना यांच्या डोक्यावर पिस्तूल रोखलं आणि ट्रिगर दाबणार, इतक्यात आजीने धाडस दाखवलं. आजीने शैलाच्या हातातील पिस्तूल हिसकावून थेट खिडकीच्या बाहेर फेकून दिलं. पिस्तूल गेलं तरी शैलाचा राग शांत झाला नव्हता. तिने सोबत आणलेला धारदार चाकू काढला आणि साधना यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. साधना रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या तरीही शैला वार करतच राहिली. या भीषण हल्ल्यात साधना यांचा जागीच मृत्यू झाला.

शैलाने घरात घेतलं कोंडून– या घटनेनंतर आरोपी शैलाने स्वतः ला घरात कोंडून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. वाळूज एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दरवाजा तोडून शैलाला ताब्यात घेतलं. प्राथमिक माहितीनुसार, साधना यांचे पती महेंद्र आणि आरोपी शैला यांच्यात जुने संबंध होते. या वादातूनच हे टोकाचं पाऊल उचलल्याचं समजतंय. पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आता या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. एका बाजूला आजीने दाखवलेलं धाडस कौतुकास्पद ठरलं असलं तरी, दुसरीकडे अनैतिक संबंधांच्या वादातून एका निष्पाप महिलेचा बळी गेल्याने बजाजनगरमध्ये संताप व्यक्त होत आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र

▸▸ शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ ▸▸ Page 6

## कऱ्हेवडगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळा उत्साहत सुरू ; विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथे वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज व संत भगवान बाबा महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व रंणजित बापू महाराज आरणगाव यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ एप्रिल पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे. सप्ताहाचे हे ४०वे वर्षे आहे. परीसरातील भाविकांनी किर्तन, प्रवचन व दैनंदिन महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन कऱ्हेवडगाव ▶▶ उर्वरित पान २ वर



# जनगणना २०२७ चा पहिला टप्पा महाराष्ट्र दिनी १ मे रोजी सुरुवात; राज्यात घरसूची आणि घरगणना

● राज्यात घरसूची आणि घरगणना

बीड । प्रतिनिधी

जनगणना २०२७ च्या टप्पा १ अंतर्गत घरसूची आणि घरगनणा (House Listing Operation) १ मे २०२६ पासून सुरु होणार आहे या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व तहसील तसेच नगरपालीका क्षेत्रात व्यापक प्रसिध्दी उपक्रम घेण्यात यावेत असे आवाहन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी एका पत्राव्दारे केले आहे. महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून हे काम सुरु करण्यात येत आहे. महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमा याची विशेष प्रसिध्दी करण्याच्या सूचना याव्दारे देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्र दिन (१ मे २०२६) विशेष उपक्रमः महाराष्ट्र दिनाच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमाच्या ठिकाणी जनगणनेचे माहिती फलक व स्टँन्डीज लावावेत.




आपल्या कार्यक्षेत्रातील मान्यवर व्यक्तोंकडून (Dignitaries) 'स्वयं-गणना' (Self Enumeration) करून घेऊन जनतेमध्ये त्याबाबत सकारात्मक संदेश द्यावा. पालकमंत्री किवा प्रथम नागरिक यांच्या उपस्थितीत प्रेस कॉन्फरन्स आयोजित करून जनगणनेचे महत्त्व पटवून द्यावे.

प्रसिद्धीची माध्यमे व संसाधनांचा वापरः ग्रामीण व शहरी भागात बॅनर, पोस्टर, फ्लेक्स आणि भितलेखन (Wall Writing) याद्वारे माहितीचा प्रसार करावा.

सार्वजनिक ठिकाणी ध्वनीप्रक्षेपण आणि व्हॅन केमोन (Van Campaign) द्वारे जनगणनेच्या तारखांची घोषणा करावी. उपलब्ध शासकीय यंत्रणांचा वापर करून ही मोहीम किफायतशीर पण प्रभावीपणे राबवावी. सोशल मीडिया व अफवा नियंत्रणःतालुका व नगरपरिषदेच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून जनगणनेबाबतची माहितो आणि प्रशिक्षणाचे फोटो/व्हिडिओ प्रसारित करायवेत. डेटा प्रायव्हसी संदभांत पसरणाऱ्या कोणत्याही अफवांना रोखण्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## 'वाचाल तर वाचाल'तर्फे जागतिक पुस्तक दिन उत्साहात संपन्न

### १२९ पुस्तकाचे दोन संच वाचनाकरिता वितरित

बीड । प्रतिनिधी

सोशल मीडिया व इंटरनेटच्या मायावी जाळ्यात अडकून विद्यार्थी वाचनापासून; खेळाच्या मैदानापासून दूर राहत आहेत. लहानपणापासून वाचनाची गोडी लागावी म्हणून पालकांनी आपल्या पाल्यांना चांगली पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत. वाचन संस्कृती वाढावी म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने २०१६ पासून बीड शहरात व परिसरात ४४ मोफत वाचनालये सुरू करून ३२०० पुस्तकांची उपलब्धता करून दिली आहे.आज दिनांक २३/ ४/ २०२६ रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून मौजे वरवटी तालुका जिल्हा बीड येथील ४४ व्या केंद्रात २



ऱ्या फेरीतील ४१ पुस्तकांचा संच वाचण्याकरिता ड राजेश शिंदे यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष जी.एम. भोले सर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. संचातील पुस्तके वितरणाची जबाबदारी ड राजेश शिंदे यांनी तर प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप चालवीत असलेल्या मोफत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ८८ पुस्तकांचा संच वर्गशिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्द करण्यात आला. सदरील पुस्तकांचा पुरेपूर फायदा विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावा अशी विनंती वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी केली याप्रसंगी अध्यक्ष जी.एम भोले आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की माणसाच्या जीवनात एक चांगले पुस्तक काय बदल घडवून आणू शकते हे गुरुवर्य केळुसकर गुरुजींनी भीमरावांच्या सत्कार प्रसंगी गौतम बुद्धाचे जीवन चरित्र पुस्तक भेट दिलेला प्रसंग सांगून व त्या जीवन चरित्राचा सखोल वाचन, चिंतन,मनन भीमरावांनी केले व पुढील जीवनात केलेले महान कार्य व ज्ञानप्राप्ती व देशाकरिता केलेले अतुलनीय कार्य सर्वांना ज्ञात आहे म्हणून पुस्तक वाचन म्हणजे केवळ मनोरंजन नाही तर विचार प्रगल्भता वाढविणे व जीवनात प्रगती करण्यास उत्तेजन होय डॉ.बाबासाहेबांचा बहुमोल विचार प्रत्येकाने लक्षात ठेवला पाहिजेत की पुस्तकाने मस्तक सशक्त होते आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

## शासकीय निधीतून बोगस व कागदोपत्री कामे दाखवून 25 लाखांची अफरातफर करणाऱ्यां वर गुन्हे दाखल करा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील फुलेपिंपळगाव ग्रामपंचायतचे दोन ग्राम सेवक, सरपंच,उपसरपं,पं.स.अभियंता यांनी संगनमत करुन विविध प्रकारच्या विकास कामांसाठी शासकीय निधीतून बोगस व कागदोपत्री कामे दाखवून २५लाख रुपयांची अफरातफर केली आहे याबाबत सर्व कामांची चौकशी करून ग्रामसेवक, अभियंता विरोधात गुन्हे व सरपंच,उपसरपं वर अपत्रातेची कार्यवाही करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मनोज साळवे यांनी २३एप्रिल रोजी गविअ अधिकारी यांना देण्यात निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात विविध प्रकारच्या विकास कामांसाठी शासना कडून २०२२-२३ते २०२४- २५, २०२६प्राप्त निधीची तपशीलवार माहिती देण्यात आली ती पुढिल प्रमाणे आहे.

गायकवाड गल्लीत सोलार पॅनल बसवणे ६लाख ६४हजार, ३३३रुपये, नालीवर पुल बांधकाम करणे ७०हजार, ७६४रु.,जी.पी. फुलेपिंपळगाव आपले सरकार मानधन १लाख ५०हजार,९२९, अंगणवाडी साहित्य खरेदीसाठी ८०हजार, सांडपाण्याचे व्यवस्थापन व निचरा वाहिनी निर्मितीसाठी ५लाख, ३३हजार,२३८रु.जि.प.शाळेवर सोलार पॅनल बसवणे १ लाख, ८७ हजार , ▶▶ उर्वरित पान २ वर

## वडवणी पोलिसांचा उपळी येथे हातभट्टीवर छापा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी गाव परिसरात कुंडलिका नदीकाठी गुप्तपणे हातभट्टी दारूचा कारखाना सुरू असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच वडवणी पोलिसांनी पहाटेच जोरदार धडक कारवाई केली. २२ एप्रिल २०२६ रोजी पहाटे सुमारे ५:३० वाजण्याच्या सुमारास -झख वर्षा व्हगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने कुंडलिका



नदीकाठी छापा टाकला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. छाप्यात पोलिसांच्या हाती मोठ्या प्रमाणावर हातभट्टीची सामग्री लागली. १०० ते २०० लिटर क्षमतेचे प्लास्टिक व लोखंडी असे एकूण १० ड्रम रसायनांनी भरलेले सुमारे १,२८० लिटर गावठी दारू निर्मितीचे साहित्य तसेच तयार देशी दारूही जप्त करण्यात आली या सर्व रसायनांची ▶▶ उर्वरितपान २वर

## चोरीच्या संशयातून दोन मोटरसायकल व साहित्य जप्त



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी पोलिसांकडून चोरीच्या संशयातून दोन मोटरसायकल व साहित्य जप्त त्यापैकी एक मोटरसायकलवर बार्शी शहर पोलीस ठाणे सोलापूर येथे गुन्हा दाखल दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी शिकल करी वस्ती वडवणी येथे एक इसम त्याचे पत्राचे शेडमध्ये मोटरसायकलचे पार्ट खुले करत असल्याची गोपनीय माहिती वडवणी पोलिसांना मिळाली त्यात तात्काळ प्रभारी अधिकारी वडवणी यांनी स्टाफ सह सदर ठिकाणी गेले असता तेथे एक तरुण लक्ष्मण उर्फ लच्छा सोन्या सिंग टाक व १९ वर्ष हा एका बंद खोलीत दोन मोटरसायकलची पार्ट खोलताना दिसला त्या दोन्ही मोटरसायकलची पाहणी केली असता त्यातील एक मोटरसायकल ही अनंत आप्पाराव मस्के राहणार तुळजापूर नाका बार्शी यांची असून त्यांनी त्याबाबत बार्शी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केलेला असल्याचे समजले व दुसऱ्या मोटरसायकल व साहित्य बाबत संबंधित आरोपी यास कोणताही मालकी हक्काचा पुरावा न दाखवता आल्याने दुसरी मोटर सायकल देखील चोरीची असण्याची शक्यता असल्याचे वडवणी पोलिसांनी सांगितले. दोन्ही मोटरसायकलचे नंबर MH-42 P4784, MH-13CZ2085, या प्रकारात त्या त्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आली या प्रकारानंतर शिकलकरी वस्तीवरील सर्वांच्या मोटरसायकलचे कागदपत्रांची पाहणी केली जप्त केलेल्या दो वडवणीच्या प्रभारी अधिकारी वर्षा बगाडे यांचे सह पीएसआय रुद्रा गायकवाड, पीएसआय राजू राठोड तसेच पोलीस अंमलदार खरात, उबाळे, कप्पे, राऊत, साळुंखे, कानतोडे, मुंजाळ, जावळे, यांनी केली.

## शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाण्यांसाठी अर्ज करावेत तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी अनुदानित बियाण्यांचा लाभ घ्यावा, यासाठी कृषी विभागाकडून महाडीबीटी (चरहरऊझढ) पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पात्र शेतकऱ्यांना विविध पिकांच्या बियाण्यांवर शासनाकडून अनुदान दिले जाणार असून, अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहे.यासाठी शेतकरी बांधवांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर तात्काळ



अर्ज करावा, असे आवाहन आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत ज्वारी, मका, सोयाबीन, तूर, मूग आणि उडीद या पिकांच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी ही प्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये १० वर्षांच्या आतील व १० वर्षांवरील अधिसूचित वाण, तसेच गळीत धान्य (तेलबिया) अभियानांतर्गत ५ वर्षांच्या आतील वाणांचा समावेश आहे.लाभार्थ्यांची निवड 'आधी अर्ज करणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी www. mahadbt.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे.वैयक्तिक शेतकऱ्यांनी '-सीळींरलज्ञ' आयडीद्वारे, तर शेतकरी गट किंवा उत्पादक कंपन्यांनी त्यांच्या अधिकृत सदस्याच्या '-सीळींरलज्ञ ऋीशी खऊ द्वारे महाडीबीटी प्रणालीवर नोंदणी करावी.अर्जाची प्रक्रिया दि. १५ मे २०२६ पर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती तरटे यांनी दिली.शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी कृषी विभागाचे अधिकृत संकेतस्थळ www. krishi.maharashtra.gov. in ला ▶▶ उर्वरित पान २ वर




*बीड : दराडे सर यांच्या गृह प्रवेश वास्तू शांती निम्मित शुभेच्छा देतांना समाज कल्याण अधिकारी श्री. अंकुश नखाते, दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, पिंटू शेट करडुले, ऍड दिपक गायकवाड. चायचित्रात दिसत आहेत.*

## माजलगांवात महावितरणचा भोंगळ कारभार; 14 तास वीजपुरवठा खंडित, नागरिक संतप्त

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील वीजपुरवठ्याबाबत महावितरणच्या कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील एका भागातील झाडतोडीच्या कामासाठी तब्बल १४ तास संपूर्ण माजलगांव शहराचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने नागरिकांना दिवसभर मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित काम केवळ



### मेंटेनस च्या नावाखाली नागरिकांना वेठीस ?

**सध्या कार्यरत असलेले अभियंता सांगुलकर हे देखभाल (मेंटेनन्स) कामांच्या नावाखाली संपूर्ण माजलगांव शहराचा वीजपुरवठा खंडित करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. योग्य नियोजनाअभावी नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.**

एका परिसरात सुरू असताना संपूर्ण शहराचा वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला. त्यामुळे व्यापारी, शेतकरी, लघुउद्योग तसेच विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. उष्णतेच्या तीव्रतेमुळे घरगुती वापरकर्त्यांनाही त्रास सहन करावा लागला. नागरिकांनी सांगितले की, मागील वर्षी पावसाळ्यातही महावितरणकडून अशाच प्रकारे वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. एका महिन्यात तब्बल आठ दिवस, आठवड्यातून दोन दिवस वीजपुरवठा बंद ठेवण्याची वेळ आली होती. त्यामुळे नागरिकांचा संयम आता सुटत चालला आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीचे अभियंता चौधरी यांच्या कार्यकाळात अशा प्रकारचा त्रास नागरिकांना सहन करावा ▶▶ उर्वरित पान २ वर